लोकमत

# धडाडीचे नेतृत्व, पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ



**के. के. वाघ शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांची आज (दि. २२ जुलै) पुण्यतिथी. त्यानिमित्त....**

**नाशिक** जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सहकार क्षेत्राचा इतिहास ज्या नावाशिवाय अपूर्ण राहतो, ते महनीय व्यक्तिमत्त्व म्हणजे कर्मवीर काकासाहेब वाघ! ज्यांच्या नावाने बुधवारी के. के. वाघ शिक्षण संस्था नावारूपास आली आहे, त्या कर्मवीर काकासाहेबांचा नाशिकच्या जडणघडणीतील वाटा अत्यंत मोलाचा आहे. १९२० च्या काळात ब्रिटिशांचे शिक्षण धोरण प्रतिगामी होते, तर मिशनऱ्यांचा भर मर्यादित वर्गापुरता होता. अशा वेळी छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले आणि श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या विचारांचा वारसा चालवत काकासाहेबांनी बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा ध्यास घेतला.

त्यांचे इंग्रजी शिक्षण नाशिकच्या 'गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कूल येथे झाले. बांधकाम शास्त्रात विशेष गती असलेल्या काकासाहेबांनी उभारलेल्या वास्तू आजही भक्कम उभ्या आहेत.नाशिक महानगरपालिकेची मुख्य इमारत हे याचे उत्तम उदाहरण आहे. १९४८ मध्ये इगतपुरीच्या तांदळाला गुजरातच्या तांदळापेक्षा कमी भाव दिला गेला. या अन्यायाविरुद्ध काकासाहेबांनी मोरारजी देसाई यांच्याशी वैचारिक मतभेद असतानाही भेट घेतली. त्यांनी 'भातशेती लढा' उभारला, ज्यामुळे त्यांना ६ जिल्ह्यांतून हद्दपार करण्यात आले. या काळात त्यांच्या पत्नी गीताई वाघ यांनी या लढ्याचे खंबीर नेतृत्व केले. जंगल लढा आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही त्यांचे योगदान ऐतिहासिक राहिले. १९५७ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्यात निफाड मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्यावर त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न विधानसभेत लावून धरले. १९६५ मध्ये यशवंतराव चव्हाण दिल्लीत गेल्यानंतर ओझर येथे 'मिग' विमान कारखाना सुरू होण्यात काकासाहेबांच्या प्रयत्नांचा मोठा वाटा होता. पिंपळगाव बसवंत येथे वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यासाठी काकासाहेबांनी गावोगावी फिरून निधी उभारला. मुदत संपलेली असतानाही पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. हरिभाऊ पाटसकर यांची भेट घेऊन परवानगी मिळवून दिली. आयुष्यभर स्वतःच्या घरापेक्षा सामान्य जनता, शेतमजूर आणि कार्यकर्त्यांना जपणाऱ्या काकासाहेबांना जनतेने 'कर्मवीर' ही पदवी दिली.

**समीर बाळासाहेब वाघ**
अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक